'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
मराठी साहित्य संशोधन विशेषांक Vol. 2 Issue. 3
ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2015

# संत रामदासांचे दासबोधातील संगीत चिंतन

प्रा. संगीता कृष्णराव उमाळे
अंशकालीन प्राध्यापिका
बॅरि. शेषराव वानखेडे महा. खापरखेडा.
मो. क्र. ९८८१२१५२८४

*महाराष्ट्रातील संत मंडळीचा संगीताच्या प्रसार कार्यात सिंहाचा वाटा आहे. अभंग व इतर गेय रचनेतून कीर्तनाच्या माध्यमातून संतांनी संगीत ही स्वरगंगा घरोघरी पोहचविली. आजही खेडोपाडयापासून ते शहरापर्यन्त पारंपरिक भजनी मंडळी दिसतात. संतांनी केलेल्या समाजप्रबोधनामुळे हरिनामाला संगीताची जोड लाभल्याने त्यात मोलाची भर पडली. त्यांच्या कार्याचा सांस्कृतिक ठेवा जतन करून ठेवण्यासाठी संगीत कार्याचा उल्लेख अवश्यपणे होतो. श्रीरामदासांनी श्रीमद दासबोधातून प्रकट केलेले संगीत विचार इतके प्रमाणभूत पध्दतीने मांडले आहेत की, त्याचे पठण करताच त्यातील सत्यता आणि श्रीरामदासांचा आदर शतगुणित होतो.*

**संत रामदासांचे कार्य:-**

संत रामदासानी पर्यटनाच्या निमिŸाने सूक्ष्म अवलोकन केले होते. या अवलोकनातून समाजाची नैराश्यता, मरगळलेली स्थिती त्यांना जाणवली. अशावेळी म्लेच्छ दुर्जनांच्या धर्मांधतेला वेसण घालण्याचा श्रीदासांनी निश्चय केला. धार्मिकतेची जपवणूक करित पारमार्थिक हेतूने समर्थ संप्रदायाची स्थापना केली. समर्थाच्या कार्यातून स्वराज्य रक्षण व स्वधर्मरक्षण या दोन्ही हेतूंची प्रचिती येते. श्रीराम, मारूती व माता भवानी या तीन दैवतेच्या आराधनेवर समर्थांचा संप्रदाय उभारलेला दिसतो. श्री मारोतीराया शक्ती-बुद्धीचे व समर्पित भक्तीचे प्रतिक होय. ही रुपे समर्थाना समाजासमोर ठेवायची होती. त्यांच्या मते विश्वात सत्य व अविनाशी वस्तू एकच होती व ती म्हणजे निर्गुण निराकर परब्रम्हे. निश्चल परब्रम्ह हे चिरंतनतत्व आणि शाश्वत असून या सत्यापर्यंन्त जाण्याचा एकमेव मार्ग म्हणजे भक्ती होय असे समर्थाच्या आराधनेतून दिसून येते.

RESEARCH JOURNEY

**साहित्याचे स्वरूप:-**

संत रामदासांची प्रचंड ग्रंथसंपदा आहे. या साहित्यातून त्यांच्या शब्द भांडाराची जाणीव आपल्याला होते. समर्थाची भूमिका लोकशिक्षकाची व क्रांतदर्शी समाजसुधारकाची होती. जन- कल्याणाची चिंता असणा-या रामदासांनी पद्याचा, संगीताचा साधन म्हणून वापर केलेला आहे. 'दासबोध' हा त्यांचा विचार ग्रंथ आहे. त्यामध्ये विष्वाची चिंता वाहतांना पद्याचा साधन म्हणून उपयोग केला आहे अंतरीच्या उमाळयातून व्यक्त होणारी तळमळ त्यांच्या साहित्यातून दिसून येते. करूणाश्टक या रचनेतून त्यांच्या मनातील उत्कट भाव विलक्षण वेधक आहे. मनाच्या श्लोकांमध्ये मनातील अनुभव प्रकट झालेला दिसतो. रामायणातून स्वधर्माचे रक्षण करणारे श्रीराम व त्यांचा दास मारुती यांचा आदर्ष समाजासमोर ठेवायचा होता. दासबोधातील सुबोध आणि सरळ अर्थ व्यक्त करणारी भाषा करणाष्टकातील उत्कट भाव व्यक्त करणारी भाषा, मनाच्या श्लोकातील प्रवाही रचना रामायणातील आदर्श तत्व हे संत रामदासांच्या साहित्याचे भाषा वैशिष्ट आहे.

**साहित्यातील निर्मिती -प्रेरणा:-**

संत रामदास शिवकालीन प्रवृतींशी आणि आकांक्षांश समरस झालेले होते. महाराष्टात त्यांनी बलोपासनेची दीक्षा दिली. महाराष्ट्रात दुरपर्यन्त शिष्यसंप्रदाय व मठस्थापना करून त्यांच्याद्वारे संघटनेचा पद्धतशीर मार्ग समाजाला दाखविला. आपल्या लेखनीतून पारमार्थिक बोधावर लक्ष ठेवून देखील प्रपंच नेटका करण्याची महती पटवून दिली. निष्क्रिय उदासीनता , करंटा दैववाद याविरुद्ध प्रवृत्तिपद प्रयत्नवादाची शिकवण आपल्या ग्रंथातून दिली. सकस, उत्कट भेदक आणि ओजस्वी

ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2015

साहित्यसंपदेमुळे कित्येकच ओव्यांना सुभाशितांचा दर्जा प्राप्त झाला आहे. समाजाला नाटयमयरित्या आपले विचार पटवून देण्यासाठी त्यांनी कीर्तन हे माध्यम निवडले व त्याला संगीताची जोड दिली. विवेक, चातुर्य, प्रतिकार सामर्थ्य इत्यादी अनेक गुणांची परिणामकारक शिकवण व प्रेरणा समर्थानी साहित्याद्वारे संगीतमय वाणीने समाजाला दिली.

**समर्थांची कीर्तन पद्धत:-**

समर्थांच्या आजोळी व कुळपरंपरेतील कीर्तन परंपरा समाजाच्या उद्धारासाठी अतिशय उपयुक्त ठरली. समाजाला जागृत करण्यासाठी रामदास कीर्तन करू लागले. कीर्तन हे समाजाप्रबोधनासाठी सर्वोत्कृष्ट माध्यम होते. व ते संगीताच्या जोडीने जर सांगितले तर अधिक रसाळ होईल ही धारणा समर्थांची होती म्हणून त्यांनी संगीत हे माध्यम निवडले कुळपरंपरेपासून त्यांना कीर्तनासोबतच संगीताचाही वारसा लाभला होता. चिंता करतो विश्वाची म्हणणा-या रामदासांनी कीर्तनासोबत संगीताचीही चिंता वाहिली हे दासबोध ग्रंथातील अनेक समासातील ओव्यांतून दिसून येते.

**संगीत एक श्रवणकला:-**

विद्येच्या चौसष्ट कलांपैकी संगीत ही एक श्रवणकला आहे व त्यामुळे कीर्तनाचे , श्रवणकलेचे महŸव पटवून सांगण्यासाठी त्यांनी काही दाखले दिले आहेत-

*श्रवणे आशंका फिटे। श्रवणे संशय तुटे*
*श्रवण होता पालटे। पूर्व गुण आपला॥*
*श्रवण भजनाचा आरंभ । श्रवण सर्वी सर्वारंभ।*
*श्रवणे होये स्वयंभ। सर्व माही॥*
*बहुत साधने पाहतां। श्रवणास न घडे साम्यता।*
*श्रवणेविण तत्वता। कार्य न चले॥ (दासबोध)*

ज्ञानार्जनासाठी श्रवण हे उपयुक्त साधन आहे. श्रवणाशिवाय कोणतेही कार्य अपूर्ण असते. मनुष्य ऐकून-ऐकूनच बऱ्याच गोष्टींचे आकलन करतो आणि स्वत:ची प्रगती करून घेतो हे निर्विवाद सत्य समर्थ सांगतात. तत्कालीन समाजाला श्रवणाची नितांत आवष्यकता होती. समाजापर्यंत निर्भिड विचार पोहचविण्यासाठी अगदी कोमलतेने आर्तहृदयातून समर्थानी श्रीरामाजवळ मागणे मागितले आपल्या आराध्य दैवतेला आळविण्यासाठी त्यांच्या चरणी स्वत:चे हृदय ठेवून व्यथा व्यक्त करतांना ßसंगीत गायन देरे राम। आलाप गोडी दे रे राम॥'' अशी आवडती संगीत कला श्रीरामाने द्यावी अशी आर्जव ते करतात.

समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी मुÌसुद आणि परिणामकारक बोलण्याची शक्ती हवी होती व त्यासाठी समर्थांनी कीर्तन हे माध्यम निवडले. कीर्तन हे समाज जागृतीचे फार मोठे व्यासपीठ आहे. त्यांच्या सहाय्यानेच स्खलनशील समाज जागृत करावयाचा होता. कीर्तनाला अधिक रुची येण्यासाठी संगीत, कोमलवाचा, नृत्य या कलेचे दान रामदासांनी श्रीरामांना मागितले आणि संगीताच्या माध्यमातून जनजागृती केली हे एक ऐतिहासिक सत्य आहे.

**संगीताचे प्रगटीकरण:-**

समर्थांनी सर्वप्रथम आपल्या महंतांना कार्यास जुंपवून त्यांना गायकीचे महत्त्व पटवून सांगितले. गायकीचा दाखला देताना गायकाने कसे असू नये या संदर्भात श्रीदासांचे विचार बहुमूल्य आहे.

*गर्वगाण गाऊ नये। गाता गाता गळो नये।*
*गौप्य गुप्त गर्जो नये। गुण गावे॥(दासबोध)*

घसघस करून घशाला ताण देत गाऊ नये. त्यामुळे त्याचा विपरित परिणात होतो. श्रोत्यांचे लक्ष गाण्याऐवजी खाकरण्याकडेच वेधले जाईल व त्यामुळे गाणे कोणते? आणि खाकरणे कोणते ? हा प्रश्न श्रोत्यांपुढे उभा राहिल. म्हणूनच गायन कसे करावे ही

दक्षता घेवूनच गायकाने निर्दोष संगीताकडे लक्ष दयावे. ही अवघड कला आहे म्हणूनच ती जाणत्याकडेच शिकावी असा आग्रह देखील समर्थ करतात.

***जाणत्यापाशी गावे गाणे। जाणत्यापाशी वाजवणे।***
***नाना आलाप शिकणे। जाणत्यापाशी।। (दासबोध)***

संगीत ही हृदयाची भाषा आहे. गायकाला त्या रागातून सुरांच्या माध्यमातून आपले विचार, भावना प्रगट करावयाच्या असतात.'' गायकाने श्रोत्यांचे अंतरंग ओळखलेच पाहिजे अन्यथा इतरांची आवड निवड लक्षात न घेता केलेले गायन मुर्खपणाचे ठरते. जगाच्या पाठीवर जिथे-जिथे मनुष्य आहे तिथे-तिथे त्या पद्धतीनुसार संगीत गायन आहेच म्हणूनच संगीताचा संबंध मानवाशी आहे. समर्थांनी केलेल्या संगीतकार्याचा उल्लेख करतांना त्याची तुलना या सम हेच अशी करावी लागेल.

संत रामदास हे मुळातच बहुमुखी प्रतिभा असलेले संत होते. त्यांना वर्तमान स्थितीचे अचूक भान होते. म्हणूनच वर्तमान आणि भविष्यकाळाचे सूचक संदेश त्यांनी ग्रंथातून मांडलेले दिसतात. समाजाला जागृत करण्यासाठी जीवनावश्यक अशा सर्वच अंगाला स्पर्श करणारी त्यांची नजर भविष्यात रोखली होती. त्याद्वारेच त्यांनी गायनासंबधी तन्मयतेचे विचार आपल्या काव्यातून मांडले. यावरुन संत रामदासांची संगीताची जाण किती प्रगल्भ होती हे त्यांनी ग्रंथातून सांगितलेल्या संगीत विचारातून दिसून येते. दासबोध ग्रंथामध्ये संगीताविषयक अनेक विचार मांडलेले आहेत. ग्रंथातील लिहीणे, बोलणे प्रचीतीचे आहे. समर्थांना समाजात जे दिसले तेच त्यांनी आपल्या साहित्यातून परखडपणे सांगितले.

संत रामदासांचे जीवन-कार्य श्रीरामांच्या सामर्थ्यावर व त्यांच्या अधिष्ठानावर आधारलेले आहे. कल्याणांचेही कल्याण व मंगळांचेही मंगळ करणारे श्रीराम हे कैवल्यदानी आहेत. त्यांचे सगुणरुप संगीतमयरित्या आळवणे रामदासांना अतिशय प्रिय होते. म्हणूनच श्रीदास म्हणतात 'तूपणाची कीर्ती दे' तुझ चरित्र जस धवल आहे तसेच माझे चरित्र होऊ दे तुझी कीर्ती मला दे. दासांच चरित्र जेवढं वाचाव तेवढं मन पुन्हा थक्क होऊन जातं. आणि आश्चर्याच्या सीमारेषा आणखीच लांबत जातात.

***शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे।***
***वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचे।***
***कवी वाल्मिकासारखा मान्य ऐसा।***
***नमस्कार माझा सद्गुरू रामदासा।।***

'मी'पणाचा अहंकार मोडून पांगळा होऊन ज्ञानाचे पाय घेऊन आत्मोन्नतीची वाटचाल करावी हीच शिकवण श्रीदास आपल्याला देतात.

**संदर्भ सूची:-**

१. समर्थहृदय- शंकर श्रीकृष्ण देव-ढवळे प्रकाशन ,मुंबई.
२. समर्थ आणि समर्थ संप्रदाय- र.रा. गोसावी-व्हीनस प्रकाशन, पुणे.
३. रामदासांचे साहित्यशास्त्र-भा.रा.परांजपे -स्नेहवर्धन प्रकाशन , पुणे.
४. रामदासांचे संगीत चिंतन-डॉ.कमलाकर परळीकर-संस्कार प्रकाशन ,मुंबई.
५. रामदास दर्शन-गं.बा.सरदार-मॉर्डन बुक डेपो ,पुणे.